# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ६६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. विष्णू आण्णा काटकर ,<br>मु. पो. देवराष्ट्रे, ता. पलूस, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. विष्णू आण्णा काटकर , मु. पो. देवराष्ट्रे, ता. पलूस, जि. सांगली यांनी वितरण कंपनीच्या विटा विभाग, किर्लोस्करवाडी उप विभाग येथे नवीन शेतीपंप वीज कनेक्शन मिळण्यासाठी दि. ९.११.२००९ रोजी अर्ज दिला. त्यासाठी रु. ५०/– दि. ९.११.२००९ रोजी पावती क्र. ८०११३६९ ने भरले. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार मुदतीत चलन न मिळाल्याने प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ९.२.२०१० रोजी तक्रार दिली.

अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १६८७ दि. ११.२.२०१० नुसार कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या नुकसान भरपाईबाबत निर्देश दिले. अंतर्गत कक्षाच्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार या मंचामध्ये दि. १०.३.२०१० रोजी दाखल क रण्यात आली. तक्रारदार यांनी अर्ज दिल्याच्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळाल्याच्या तारखेपर्यंत वि.प.कडून कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी के ली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फ त दाखल करण्यात आली आहे.

वितरण कंपनीने दि. १५.३.२०१० च्या नोटीसीनुसार मुद्देनिहाय अहवाल न देता तो दि. ४.५.२०१० रोजी सुनावणीचेवेळी दाखल केला. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तक्रारदार याचा अर्ज किर्लोस्करवाडी उप विभागाकडे दि. ९.११.२००९ प्राप्त झाला व शाखा कार्यालय, मोहिते वडगांव येथे दि. १४.११.२००९ ला प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. संबंधित शाखा अधिकारी यांचेकडे दि. २८.८.२००९ पासून चिंचणी शाखा कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने सर्व्हे करणेस विलंब झाला.सदरचा सर्व्हे दि. १५.३.२०१० रोजी करणेत आला. दि. तसेच सदरचे अंदाजपत्रक दि. १७.३.२०१० रोजी उप विभाग किर्लोस्करवाडी येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला. तक्रारदार यांस दि. १९.३.२०१० रोजी कोटेशन भरणेस चलन देण्यात आले व त्याने ते दि. ६.४.२०१० रोजी भरले आहे. कनिष्ठ अभियंताचे पद चिंचणी शाखा कार्यालय येथे रिक्त असल्याने कामाचा अतिरिक्त भार झाला असल्याने चलन देण्यात उशीर झाला आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ४.५.२०१० ला सुनावणीसाठी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे श्री. व्हनमाने हजर. वि.प.तर्फे प्रतिपादन करण्यात आले की, सदरच्या एल.टी. कनेक्शनसाठी १ पोलचे काम असून तक्रारदाराने टेस्ट रिपोर्ट दि. ३.४.२०१० ला दिला आहे. १५ आठवड्यांचा विलंब झाला असल्याचे मान्य केले, परंतु लेखी अहवालातील म्हणण्याप्रमाणे कामाचा जादा भार असलेने मुदतीत चलन देता आले नाही त्यामुळे विलंब माफ करावा. तसेच तक्रारदार हा तक्रार मागे घेतल्याचे पत्र देणार आहे म्हणून विनंती केली. त्यानुसार दि. १८.५.२०१० ला सहाय्यक अभियंता, किर्लोस्करवाडी यांनी मंचाला अग्रेषित केलेल्या पत्रासोबत तक्रारदार याचा अर्ज प्राप्त झाला. तक्रारदाराचे प्रतिनिधी दि. १८.५.२०१० मंचासमोर उपस्थित नाहीत. तक्रारदाराने आपल्या अर्जात चलन मिळाले आहे व माझे कनेक्शनचे काम झाले आहे, तक्रार राहिली नाही, भरपाईची मागणी करीत नाही असे लिहून दिले.

वितरण कंपनीने लेखी अहवालात दिलेली कारणे विलंब माफीसाठी संयुक्तिक वाटत नाहीत. अभियंत्याचे रिक्त पद असलेस एखादा शाखा कार्यालयातील प्रभारी शाखा अभियंता ते काम पहात असतो. कामाचा अतिरिक्त भार विलंबासाठी संयुक्तिक कारण होवू शकत नाही. दि. ८.१२.२००९ ते १९.३.२०१० या काळातील विलंबापोटी भरपाई मिळण्याचा तक्रारदाराचा हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. परंतु चलनाची रक्कम दि. ६.४.२०१० ला भरल्यानंतर दि. ३.४.२०१० ला टेस्ट रिपोर्ट दिला आहे व दि. १२.५.२०१० च्या तक्रारदाराच्या अर्जात कनेक्शनचे काम झाले आहे असे म्हटले आहे. त्यामुळे ग्राहक विलंबापोटी मिळणाऱ्या भरपाईच्या रकमेबाबतची मागणी मागे घेत आहे व भरपाईचा हक्क सोडून देत आहे असे दिसते. अशा परिस्थितीत, तक्रारदाराने भरपाईचा हक्क सोडला असल्याने व तक्र ार रद्द करण्याची विनंती केली असल्याने वि.प.स दि. ८.१२.२००९ ते १९.३.२०१० या १५ आठवड्यांच्या कालावधीच विलंबाबाबत प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १५००/– च्या भरपाईचे आदेश देणे संयुक्तिक होणार नाही. तक्रार निकाली काढण्याचे आदेश देणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश ड्ढ

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराचा मंचाकडे दि. १८.५.२०१० रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :